ePaper

## उद्धव ठाकरेंना औरंगजेबाचे नाव घ्यायची लाज वाटते : देवेंद्र फडणवीस



|| वर्ष - 8 | अंक -118 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- एजाजसारखे गोलंदाज प्रत्येक क्लबमध्ये
- ऑस्ट्रेलियाविरुद्ध जिंकूच शकत नाही
- 'व्हाइट हाऊस'साठी अटीतटीची लढाई!
- वैयक्तिक मालमत्ता संपत्ती असू शकत नाही

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 6 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबतच्या विविध उपाययोजना

# विद्यार्थी सुरक्षेबाबत शिक्षण विभाग सतर्क !

### वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागवला : शिक्षण उपसंचालकांचे आदेश

। पुणे । महाईन्यूज

**राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे निर्देश शाळांना शिक्षण विभागाकडून देण्यात आलेले आहेत. मात्र, या उपाययोजनांची अंमलबजावणी होत नसल्याचे समोर आले असून या संदर्भातील वस्तुस्थितीदर्शक अहवाल ७ नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे आदेश शिक्षण उपसंचालकांना शिक्षण आयुक्त कार्यालयाचे शिक्षण सहसंचालक दिलीप जगदाळे यांनी दिले आहेत.**



बदलापूर येथे घडलेल्या घटनेनंतर शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबतच्या विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. त्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यातील शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने काळजी घेणे, विद्यार्थी सुरक्षिततेसाठी शाळेमध्ये तक्रार पेटी बसवणे, सखीसावित्री समितीच्या तरतुदींचे पालन करणे, विद्यार्थी सुरक्षा समिती स्थानिक पातळीवर नियुक्त करणे अशा उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे निर्देश शिक्षण विभागाने दिले होते. मात्र, उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत विविध माध्यमांमधून काही तक्रारी आक्षेप नोंदवण्यात येत असल्याचे जगदाळे यांनी परिपत्रकात नमूद केले आहे.

### समित्या केवळ कागदावर...

शालेय विद्यार्थी सुरक्षेसंबंधी त्रुटी राहिल्याबद्दल शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शाळांना नोटिसा दिल्यानंतर पुढे कोणतीही कारवाई केलेली नाही, अनेक शाळांमध्ये सीसीटीव्ही बंद आहेत, सीसीटीव्हीचे बॅकअप ठेवण्यात येत नाही, विविध समित्या केवळ कागदावर स्थापन केलेल्या आहेत, त्यांचे अहवाल निरीक्षणासाठी उपलब्ध नाहीत, स्कूल वाहन सुरक्षेसंबंधी उपाययोजना केलेल्या नाहीत. स्कूलवाहन चालकांचे मोबाइल क्रमांक उपलब्ध नाहीत, कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी केलेली नाही, अशा स्वरुपाच्या तक्रारींचा समावेश आहे.

## विकासकामांच्या जोरावर पुन्हा निवडून येणार!

### आमदार आण्णा बनसोडे यांचा विश्वास : पिंपरीत महायुतीच्या प्रचाराची आघाडी

। पिंपरी ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

माझा जनसंपर्क, आजवर केलेली कामे, राबवले समाजोपयोगी उपक्रम आणि महायुतीचा पाठिंबा या जोरावर मी पुन्हा निवडून येईन, अशा विश्वास राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले) या महायुतीचे पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला.



विधानसभा निवडणूक प्रचाराची धामधूम सुरू असताना आमदार अण्णा बनसोडे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. आमदार अण्णा बनसोडे म्हणाले, आता निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. पिंपरी विधानसभा मतदारसंघातून २१ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतले आहेत. या उमेदवारांची समजूत काढण्यासाठी महायुतीच्या सर्वच नेत्यांनी प्रयत्न केले. उमेदवारी माघारी घेतलेल्या २१ जणांपैकी १९ उमेदवारांनी महायुतीला पाठिंबा दिला आहे. जे उमेदवार नाराज होते त्यांची नाराजी दूर झाली आहे. सर्वजण आजपासून प्रचारात सक्रिय सहभागी झाले आहेत.

### विविध विकासकामे मार्गी लावली : बनसोडे

पिंपरी विधानसभा मतदारसंघात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आकुर्डी व पिंपरी येथे ९३८ सदनिका, दापोडी ते निगडी हायवेलगत पाईप लाईन, दापोडी ते निगडी दरम्यान अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार रस्ते विकसीत, बोपखेल येथील मुळा नदीवरील पुलाचे लोकार्पण, यशवंतराव चव्हाण रुग्णालय येथे निवासी डॉक्टरांसाठी निवास व्यवस्था व पदव्युत्तर शिक्षणासाठी इमारत, निगडी-रावेत किवळे यांना जोडणारा रेल्वेलाईनवरील पुलाचे बांधकाम, फुगेवाडी येथे महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या पहिल्या शाळेची सुरुवात इत्यादी प्रमुख कामे मागील काळात पुर्णत्वास गेली आहेत.

> मी लोकांमध्ये राहून त्यांचे काम करणारा कार्यकर्ता आहे. त्यामुळे माझा जनसंपर्क चांगला आहे. आजवर केलेली कामे, जनतेचा विश्वास आणि महायुतीचा पाठिंबा यावर मी पुन्हा निवडून येईन असा विश्वास आहे.
>
> **–आण्णा बनसोडे,** आमदार, उमेदवार. महायुती.

# मावळात भाजपाचा महायुती धर्म!

## देवेंद्र फडणवीस यांचा ‘शब्द’ : संपूर्ण भाजपा सुनील शेळकेंसोबत!

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळमध्ये भाजपा-शिवसेना- राष्ट्रवादी-आरपीआय व मित्र पक्ष महायुतीच्या अधिकृत उमेदवाराला विरोध करीत अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देणाऱ्यांसोबत भाजपा नाही. संपूर्ण भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार सुनील शेळके यांच्या पाठिशी उभी करणार आहेत.**




मी स्वत: मावळात पूर्ण ताकदीने उतरणार आहे, असे सूतोवाच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. याबाबत पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आणि फडणवीस यांचे मोबाईलवर संभाषण झाले. त्यामध्ये फडणवीस यांनी सुनील शेळकेंसाठी आम्ही प्रयत्न केले. मात्र, काही लोकांनी वैयक्तिक दुश्मनीतून पक्षविरोधी भूमिका घेतल्याचे सांगितले. दरम्यान, चिंचवड विधानसभा मतदार संघात महायुतीची उमेदवारी भाजपाचे शंकर जगताप यांना मिळाली. त्यावेळी नाना काटे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घ्यावा. यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची मनधरणी केली. त्यामुळे “जो न्याय चिंचवडमध्ये तोच न्याय मावळात असला पाहिजे. मावळातही महायुतीच्या धर्माचे पालन व्हावे..” अशी मागणी नाना काटे यांनी केली. यावर “तुम्ही निश्चिंत रहा... आम्ही सुनील आण्णांचे पूर्ण ताकदीने काम करणार आहेत, ” असा विश्वास फडणवीस यांनी दिला आहे.

### काय म्हणाले देवेंद्र फडणवीस...


उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाना काटेंना फोन करुन संवाद साधला. यावेळी, मावळ पॅटर्न आणि सुनील शेळकेंसंदर्भात चर्चा केली. “मी संपूर्ण भाजप त्यांच्यामागे उभी करतोय, पण जे आपल्याला सोडून गेले आहेत, त्यांची मी तुम्हाला गॅरंटी देत नाही. मी स्वत: जात आहेत, सुनीलला माहितीय मी किती प्रयत्न केले, स्वत: बावनकुळे साहेब 4 तास तिथं बसून होते. मात्र, ते ऐकायला तयारी नाहीत. पण, मी भाजपची ताकद सुनील शेळकेंच्या पाठीशी उभी करतोय,” असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी मावळ पॅटर्न हाणून पाडण्यासंदर्भात व महायुतीचा धर्म पाळण्याबाबत नाना काटेंना

# निवडणूक प्रचारात सहभागी झाल्यास कारवाई!

## शिक्षण विभागाचे निर्देश : आचारसंहितेचे पालन करावे लागणार!

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यातील अकृषि विद्यापीठ आणि सलंग्नित महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचारात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. त्याबाबतचे निर्देश उच्च शिक्षण विभागाने राज्यातील सर्व विद्यापीठ, महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्थांना दिले आहेत.**



उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. त्यानुसार आचारसंहिता नियमाचे पालन करण्याबाबतचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. राज्यातील विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी समाईक परिनियम अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही, त्यांच्याशी संबंध ठेवता येणार नाही किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कामात कोणत्याही प्रकारे भाग घेता येणार नाही अथवा सहाय्य करता येणार नाही, असे परिपत्रकात नमूद केले आहे.

### मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रयत्न...

कोणताही कर्मचारी विधानसभेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीत प्रचार करु शकणार नाही, हस्तक्षेप करु शकणार नाही, त्यासंबंधी आपले वजन खर्च करु शकणार नाही किंवा त्यात भाग घेऊ शकणार नाही. त्यामुळे विद्यापीठ किंवा संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक कामात किंवा प्रचार कामात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना देण्यात आली आहे. त्यात महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना मतदान करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

# रक्ताचे नमुने बदल प्रकरणात आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



कल्याणीनगर अपघात प्रकरणात मोटारचालक अल्पवयीनाच्या मित्राचे रक्ताचे नमुने बदलल्या प्रकरणी दाखल गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालायने फेटाळून लावला. अरुणकुमार देवनाथ सिंग असे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळलेल्या आरोपीचे नाव आहे. यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने सिंग याचा अटकपूर्व जामीन फेटाळला होता. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सुधांशु धुलिया आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठाने याबाबतचे आदेश दिले. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार झालेल्या सिंग याला आता पुणे पोलिसांसमोर शरण यावे लागणार आहे.येरवड्यातील कल्याणीनगर भागात १९ मे रोजी भरधाव मोटारीच्या धडकेत दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुण-तरुणीचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवालच्या मुलास पोलिसांनी ताब्यात घेतले होते. मोटारचालक अल्पवयीनाबरोबर मोटारीत त्याचे दोन मित्र होते. अगरवालचा मुलगा, त्याच्याबरोबर असलेल्या दोन मित्रांनी मद्यप्राशन केले होते. वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना ससून रुग्णालयात नेण्यात आले होते. रुग्णालायत तिघांच्या रक्ताच्या नमुन्यात बदल करण्यात आले होते. बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवाल, त्याची पत्नी, शिवानी, अरुणकुमार सिंग यांनी ससूनमधील डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळानोर यांच्याशी संगनमत करुन रक्ताचे नमुने बदलल्याचे तपासात उघड झाले होते. याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल केल्यानंतर सिंग पसार झाला होता. त्याने याप्रकरणात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी शिवाजीनगर, तसेच मुंबई उच्च न्यायालयात अर्ज केले होते. त्याचे अर्ज फेटाळण्यात आले होते. त्यानंतर त्याने सर्वोच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी अर्ज केला होता. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला आदेश सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवून सिंग याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.

## चऱ्होलीकर म्हणतात...

# आम्ही महेशदादांसोबत!

### राजकीय संधी दिली म्हणून विकास : आपुलकीच्या गाठीभेटींना उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“आमच्या च-होलीला महापौरपद देऊन शहराचे नेतृत्व करण्याची संधी देणाऱ्या आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहे”, अशी ग्वाही च-होलीकरांनी दिली आहे.**



भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी- आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या समाविष्ट गावातील च-होलीतील आपुलकीच्या गाठीभेटींना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी ठिकठिकाणी आमदार लांडगे यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले.

‘भोसरी माझी आई, तर च-होली माझी मावशी’ असल्याचे आमदार महेश लांडगे यांनी सांगितले आहे. भोसरीप्रमाणेच आपले च-होलीकरवर प्रेम आहे. त्यामुळेच च-होलीच्या विकासासाठी मी कधी कमी पडणार नसल्याची ग्वाही आमदार लांडगे यांनी दिली. च-होलीतील आपुलकीच्या गाठीभेटींना ठिकठिकाणी मोठा प्रतिसाद मिळाला. महिलांनी रांगोळ्या काढून स्वागत केले. चऱ्होली फाटा येथून सकाळी साडेनऊ वाजता आपुलकीच्या गाठीभेटींना सुरुवात झाली. पठारे मळा, कोतवालवाडी, साठेनगर, चऱ्होली गावठाण, बोर्डे वस्ती, दाभाडे वस्ती, आझाद नगर, चोवीसावाडी, वडमुखवाडी, दत्तनगर, काळी भिंत, चऱ्होली फाटा, आनंद तरंग सोसायटी, वाघेश्वर कॉलनी परिसरातील नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या. काटे वस्ती येथे कोपरा सभा पार पडली. या प्रचार फेरीत माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, सचिन तापकीर, विकास बुर्डे च-होली ग्रामस्थ महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते फेरीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

#### चऱ्होलीचा कायापालट झाला...

महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर आमदार महेश लांडगे यांनी नितीन काळजे यांच्या रूपाने चऱ्होलीला महापौरपद दिले. शहराचे नेतृत्व समाविष्ट गावाकडे आले. भाजपची सत्ता आल्यानंतर चऱ्होलीच्या विकासाला गती मिळाली. अंतर्गत रस्ते, पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या. सुविधा निर्माण झाल्याने मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण संस्था उभारल्या. परिसराचा कायापालट झाला आहे. 2017 नंतर चऱ्होली पिंपरी-चिंचवड शहरात आल्यासारखे वाटू लागले. त्यामुळे आमच्या चऱ्होलीचा चेहरा-मोहरा बदलणाऱ्या आणि शहराचे नेतृत्व करण्याची संधी देणाऱ्या आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याची ग्वाही च-होलीकरांनी दिली.

“ १९९७ मध्ये महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांच्या विकासाला प्राधन्य देण्याची भूमिका आम्ही ठेवली. माजी महापौर नितीन काळजे यांच्या रुपाने पहिल्यांदा समाविष्ट गावांना मानाचे पद देण्याची संधी मिळाली. माजी महापौर राहुल जाधव हेसुद्धा या भागातून प्रतिनिधीत्व करीत होते. यासह स्थायी समिती, शहर सुधारण समिती, क्रीडा समिती अशा महत्त्वाच्या समितींवर या भागातील सहकाऱ्यांना संधी मिळाली. पायाभूत सोयी-सुविध सक्षम करता आल्या. त्यामुळेच आज “चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर” विकसित झाला आहे.

**- महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

## चिंचवडमध्ये महायुतीचा ‘डोअर टू डोअर’ प्रचार!

### आमदार आश्विनी जगताप : विकासासाठी शंकर जगताप यांना साथ द्या

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी पिंपळे निलख परिसरात दौर केला. या दौऱ्यात त्यांनी विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्थानिक नेते, आणि सामान्य नागरिकांशी ‘डोअर टू डोअर’ भेट घेत संवाद साधला.**



यावेळी ज्येष्ठ नेते सचिन साठे, माजी पोलीस पाटील भुलेश्वर नांदगुडे, युवा नेते नितीन इंगवले, माजी नगरसेविका आरती चोंधे, अरुणा गायकवाड, माजी नगरसेवक संदीप कस्पटे, स्नेहा कलाटे, काळूरामशेठ नांदगुडे, नंदू बालवडकर, बाळासाहेब जगताप, संतोष साठे, माऊली साठे, अनिल संचेती, सुरेश गायकवाड, आनंद साठे, सोमनाथ इंगवले, अनंत कुंभार, शिरीष साठे, रणजीत कलाटे, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर, सूर्यवंशी मॅडम यांच्यासह महायुतीतील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

अश्विनी जगताप यांच्या या दौऱ्यास पिंपळे निलख तसेच विशाल नगर परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप व त्यानंतर अश्विनी जगताप यांच्यामुळेच आमच्या भागाचा सर्वांगीण विकास झाला आहे. यापुढेही येथील विकासाला आणखी गती मिळावी याकरिता आम्ही शंकर जगताप यांच्याच पाठीशी ठामपणे उभे राहणार असल्याचे आश्वासन नागरिकांनी यावेळी दिले.

“ पिंपरी चिंचवड शहराचा भौगोलिक विकास पाहता चिंचवड विधानसभा मतदारसंघ हा एक विकसित विधानसभा म्हणून उदयास आला आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वात पिंपळे निलख, विशाल नगर या परिसराचा कायापालट झाला आहे. आता शंकर जगताप विकासाला गती देतील.

**– आश्विनी जगताप,** आमदार,

#### प्रभाग 26 मध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे...

चिंचवड मतदार संघातील विकासाला चालना देत असताना इतर सर्व प्रभागांसोबत प्रभाग क्रमांक २६ मध्ये देखील खूप मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात आली आहेत. येणाऱ्या काळामध्ये या विकासाला गती देण्याचे स्वप्न उराशी बाळगून महायुतीचे उमेदवार शंकर जगताप हे या निवडणुकीला आपल्या समोर जात आहेत. आपण चिंचवडच्या विकासासाठी आणि आपल्या शहराला जगाच्या पाठीवर विकसित विधानसभा ओळख मिळावी यासाठी शंकर जगताप यांना क्रमांक २ समोरील कमळ या चिन्हासमोरील बटण दाबून विजयी करा असे आवाहन अश्विनी जगताप यांनी केले.

# आदिवासी तुमच्यासाठी नाचणार नाहीत!




**आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी २०१३ साली व्हर्जिनीयस खाखा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली... एस.एस. राजामौली यांचा 'आर. आर. आर. (२०२२) हा सिनेमा प्रदर्शित झाला. तो प्रचंड गाजला; मात्र यातील कोमाराम यांच्या पात्रावरून वाद झाला. गोंड आदिवासींचा अवमान झाला, अशी टीका केली गेली.**

अगदी काही संशोधनपर लेखांमध्येही आदिवासींचे पठडीबाज चित्रण केले आहे, असे म्हटले गेले. केवळ हाच सिनेमा नव्हे बहुतांश बॉलीवूड सिनेमाने आदिवासींचे असेच एकारलेले, पठडीबाज आणि व्यंगात्मक चित्र रंगवले आहे. अगदी 'चढ गया पापी बिछुआ' ते 'झिंगा लाला हू हू' अशा गाण्यांमधूनही आदिवासी हे रानटी, विक्षिप्त, जंगली असतात, असे दाखवले गेले आहे. ते मागास, बुद्धू आणि असभ्य आहेत, असे सातत्याने म्हटले जाते. थेट म्हटले नाही तरी बहुसंख्यांच्या नेणिवेत ते असते. जयपालसिंग मुंडा संविधानसभेत आले तेव्हाही त्यांना हीन दाखवण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळेच ते संविधानसभेत म्हणाले, "मी जंगली आहे, याचा मला अभिमान आहे." जंगली हे नकारात्मक अर्थाने म्हटले गेले असले तरी 'जल, जंगल, जमीन' यांच्याशी असलेले जैव नाते मुंडा यांनी अधोरेखित केले



आणि आदिवासी समुदायासाठी संवैधानिक तरतुदींचा आग्रह धरला.या समुदायाला मुख्यप्रवाहात सामील करून घेण्यासाठी आणि सार्वजनिक व्यवहारात प्रतिष्ठेचे स्थान देण्यासाठी २०१३ साली भारत सरकारने एक समिती गठित केली. व्हर्जिनीयस खाखा हे या समितीचे अध्यक्ष होते. या समितीने २०१४ मध्ये अहवाल सुपूर्द केला. त्यामध्ये संविधानातील पाचवी अनुसूची, सहावी अनुसूची, वन हक्क कायदा, पेसा कायदा यांच्या परिणामकारकतेचा आढावा घेतला आणि पाच मूलभूत मुद्दे उपस्थित केले: (१) रोजगार आणि उदरनिर्वाह (२) शिक्षण (३) आरोग्य (४) जमिनीचे हक्क आणि सक्तीचे स्थलांतर. (५) कायदेविषयक आणि सांविधानिक मुद्दे. आदिवासी समुदायात गरिबी व निरक्षरता मोठ्या प्रमाणावर आहे. कुपोषण आणि त्यामुळे बालमृत्यूचे प्रमाणही अधिक आहे. हे सारे नोंदवून या अहवालात काही महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या होत्या. आदिवासी शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण संस्था स्थापन करून सेंद्रिय शेतीस, पर्यावरणपूरक वनीकरणावर भर देणे. आदिवासींकडून बळकावल्या जाणाऱ्या जमिनींच्या विरोधात संस्थात्मक उपाययोजना करणे. पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे. त्यासाठी ग्रामसभा अधिक सशक्त करणे. पाचव्या आणि सहाव्या अनुसूचीमधील क्षेत्रासाठीचे कायदे आणि धोरणे राज्यपालांच्या स्वविवेकाधीन अधिकारांनी पार पडतात. त्यांना आदिवासी मंडळाचा सल्ला बंधनकारक करणे. पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक आदी ठिकाणी अनेक गावांमध्ये आदिवासी बहुसंख्य असल्याने तिथे अनुसूचित क्षेत्र घोषित करणे. समूहांचे वन हक्क कायदे संरक्षित करणे आणि त्यांचे जतन करणे. अशा अनेक महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या होत्या. या अहवालाचे सारांश रूपातील एक वाक्य आहे: भारतातील आदिवासी समुदायाची त्यांच्या मूल्यसंस्कृतीबाबत हेटाळणी केली जाते, त्यांच्यावर गंभीर भौतिक आणि सामाजिक अन्याय होतो आणि त्यांना त्यांच्याच संसाधनांपासून वंचित केले जाते. हे सांगणाऱ्या अहवालाकडे २०१४ पासून केंद्र सरकारने अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. द्रौपदी मुर्मू या आदिवासी महिला देशाच्या राष्ट्रपती असतानाही आदिवासींच्या स्थितीचे चित्र विदारक आहे. 'द आदिवासी विल नॉट डान्स' या कथासंग्रहातून युवा साहित्य अकादमी विजेत्या हंसदा सोवेंद्र शेखर या लेखकाने आदिवासींना वस्तुसंग्रहालयातील शोभेची वस्तू असल्याप्रमाणे वागवू नका, असे म्हटले होते. आदिवासी केवळ आता तुमच्या मनोरंजनासाठी नाचणार नाहीत, असेच त्याने सुचवले आहे. त्यामुळेच आदिवासींच्या विकासासाठी सरकारी स्तरावर प्रयत्न व्हायला हवेतच; पण त्यांच्याबाबतची इतर समाजाची मानसिकताही बदलायला हवी. तरच संविधानातील या विशेष तरतुदींना समग्र अर्थ प्राप्त होईल.

## प्रासंगिक »

### मदरसे 'कबूल'

*केवळ उत्तर प्रदेशातीलच नव्हे तर देशभरातील मदरशांबाबत ठरवून निर्माण केला जाणारा गोंधळ यापुढे शमेल, ही आशा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे रास्त...*

उत्तर प्रदेश सरकारचा मदरसा शिक्षण सुधारणा कायदा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी वैध ठरवला ही घटना वैधानिक तसेच राजकीयदृष्ट्याही महत्त्वपूर्ण ठरते. मदरसा या इस्लामचे धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्था. त्यातून दिले जाणारे शिक्षण कालबाह्य असते आणि त्यातून फक्त धर्मांध तयार होतात असे मानणे हा अलीकडे बहुसंख्याकांतील एका वर्गाचा छंद झालेला आहे. वास्तविक शिक्षण आणि धर्मांधता यांचा संबंध असतोच असे नाही. अमेरिकेत ९/११ चा उत्पात घडवून आणणाऱ्या अतिरेक्यांतील एक तर थेट उच्च गुणवत्तेसाठी विख्यात पाश्चात्त्य अर्थशास्त्र संस्थेचा विद्यार्थी होता. तरीही त्यास दहशतवादी हल्ल्यात सहभागी व्हावे असे वाटले. उच्च शिक्षितांतील अनेक वैचारिकदृष्ट्या किती कट्टर धर्माभिमानी असतात याची कित्येक उदाहरणे अन्य धर्मीयांतही आढळतात.

उद्धव ठाकरे यांना नावे ठेवण्याशिवाय सत्ताधाऱ्यांना दुसरे काही सुचत नाही, असे दिसते. त्यांची मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द केवळ अडीच वर्षांची होती. त्यानंतर त्यांच्याकडून पक्ष, चिन्ह, निवडून आलेले लोकप्रतिनिधी सारे काही हिरावून घेतले गेले. एवढे झाल्यावरही सत्ताधारी 'त्यांनी काय केले.

# दिखावा विरुद्ध सलोखा!

कोणताही भेदभाव न बाळगता काम केले आणि प्रत्येकाच्या हृदयात आणि कुटुंबात स्थान मिळवले. आजच्या सत्ताधाऱ्यांप्रमाणे केंद्रातील शीर्षस्थ नेत्यांच्या दरबारी लोटांगण घालून महाराष्ट्राला अनेक दशके मागे नेले नाही. गेल्या दहा- बारा वर्षात राज्याची सतत पीछेहाट झाली, हे सिद्ध करण्यासाठी कुठल्या अहवालाची वा तो विरोधकांनी लिहिला की सत्ताधाऱ्यांनी याचीही शहानिशा करण्याची आवश्यकता नाही. कर्जबाजारी, बेरोजगारांचे, महिला असुरक्षित असणारे, गुंतवणूकदार आणि प्रकल्प सहज गुजरातला पळवून नेऊ देणारे आणि केंद्रातील सत्ताधीशांच्या सत्तालोलुप राजकारणामुळे वैचारिक वाताहत होत असलेले राज्य हीच महाराष्ट्राची ओळख झाली आहे. डोळ्यांवर राजकीय झापडे लावून या विषयाकडे पाहण्याची आवश्यकता नाही.पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या निष्कर्षात राज्याचे सकल उत्पन्न घटले असे म्हटले त्यात वावगे काय. मुंबईतील सूतगिरण्या, दीड लाख



मराठी तरुणांना रोजगार देऊ शकणारे नियोजित आयएफएससी, महाराष्ट्रातील २२ हजार कोटींचा टाटा एअरबस प्रकल्प, पालघर येथील राष्ट्रीय सागरी सुरक्षा प्रशिक्षण केंद्र, मुंबईतील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे कामकाज, मुंबईतील १७ हजार कोटींचा हिरे व्यापार, दरवर्षी मुंबईत होणारा फिल्मफेअर पुरस्कार सोहळा, शेअर बाजाराचे कामकाज, देशातील पहिला पाणबुडी पर्यटन प्रकल्प, प्रस्तावित बल्क ड्रग पार्क, विश्वचषकाचा अंतिम सामना, विमानतळ कार्यालय सारे काही गुजरातला वळविले गेले. बुलेट ट्रेनचा सर्वाधिक लाभ, खान्देशातील तापी, गिरणा नदीच्या पाण्याचा उपयोग गुजरातलाच होणार आहे. ताडोबा आणि गडचिरोलीतील १२ हत्ती गुजरातला. महाराष्ट्र सरकारच्या महानंद डेअरीच्या व्यवस्थापनाचे अधिकार गुजरातला. महाराष्ट्रात होणारा दीड लाख कोटींचा वेदांता-फॉक्सकॉन सेमीकंडक्टर प्रकल्पही गुजरातला आणि एवढे करून गुजरातमधून महाराष्ट्राला काय मिळाले? फक्त नरेंद्र मोदी गुजरातमधून महाराष्ट्रात आले तेही आपली मते मागण्यासाठी आणि मराठी माणसाने मत दिले.महाराष्ट्राला केंद्राकडून मिळणारा निधी अपुरा आहे आणि महाराष्ट्राकडून केंद्राकडे जाणारा निधी सर्वाधिक आहे. देशात सर्वाधिक करदाते (१.३१ कोटी) महाराष्ट्रात आहेत. ते सुमारे ४.२५ लाख कोटी कर भरतात. आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचा समावेश असलेला महाराष्ट्र हा मिळकत करांत सर्वाधिक योगदान देतो. महाराष्ट्राने केंद्रीय तिजोरीत भरलेल्या ४.२५ लाख कोटींपैकी २.७२ लाख कोटी कॉर्पोरेट करांतून, १.४१ लाख कोटी वैयक्तिक आयकरातून आणि उर्वरित ११,६७३ कोटी इतर करांतून येतात. कर योगदानामध्ये दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘लाडक्या बहिणींना 1500 ऐवजी 2100 रुपये

## महिलांची पोलीस भरती’, मुख्यमंत्र्यांची 10 मोठी आश्वासनं

। नवी दिल्ली ।
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीची 2024) रणधुमाळी सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सध्या महायुती आणि महाविकास आघाडीसह सर्वच पक्षाच्या नेत्यांकडून जोरदार प्रचार सुरु आहे. महाराष्ट्रातील विविध मतदारसंघात सभा आणि मेळावे सुरु आहेत. या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. यातच आज महायुतीची एकत्रित जाहीर सभा कोल्हापूरमध्ये पार पडली.**



या सभेत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. तसेच यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी १० मोठी आश्वासने दिली आहेत. यामध्ये लाडक्या बहिणींना १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये, शेतकऱ्यांची कर्जमाफी, २५ हजार महिलांची पोलीस भरती अशी १० मोठी आश्वासने दिली आहेत."२०१४ साली झालेल्या निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात याच ठिकाणावरून आम्ही केली होती. आता देखील या ठिकाणाहून प्रचाराची सुरुवात आम्ही करत आहोत. आता २३ तारखेला आम्ही विजयाचा गुलाल घेतल्यानंतर पुन्हा या ठिकाणी आल्याशिवाय राहणार नाहीत. आमच्या महायुतीचा जो जाहीरनामा आहे, त्या जाहीरनाम्यातील १० प्रमुख आश्वासने आज या ठिकाणी मी तुमच्यासमोर सांगत आहे. आम्ही जे बोलतो ते करतो. त्यामुळे आता आम्ही लाडक्या बहिणींना १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये करणार असल्याचं आश्वासन आम्ही देत आहोत", असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. लाडक्या बहिणींना १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये देण्याचं आश्वासन. २५ हजार महिलांची पोलीस दलात भरती करण्याचं आश्वासन.शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेसह राज्य आणि केंद्राचे मिळून आता १५ हजार करणार. तसेच एमएसपीवर २० टक्के अनुदान देण्याचं आश्वासन आम्ही देत आहोत.वृद्ध पेन्शन योजनेमध्ये आता १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये करण्यात येणार आहेत.२५ लाख रोजगार निर्मिती करण्याचं काम आम्ही करणार आहोत, तसेच १० लाख विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याचं आश्वासन.२५ हजार गावात रस्ते बाधण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत. शहराच्या विकासाबरोबरच गावाचाही विकास करण्याचं आश्वासनअंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार आणि विमा सुरक्षा देण्याचं आश्वासन. विजबिलामध्ये ३० टक्के कपात करण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत. महायुतीचं सरकार आल्यानंतर 'व्हिजन २०२९' हे १०० दिवसांच्या आत सादर करण्याचं आश्वासन.दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची आज एकत्र कोल्हापूरमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना त्यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर जोरदार टीका केली. तसेच महायुतीच्या जाहीरनाम्यातील १० प्रमुख आश्वासने मुख्यमंत्री शिंदे यांनी वाचून दाखवली. तसेच हे फक्त ट्रेलर असून सविस्तर जाहीरनामा लवकरच प्रसिद्ध होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी सांगितली.या सभेत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. तसेच यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी १० मोठी आश्वासने दिली आहेत. यामध्ये लाडक्या बहिणींना १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये, शेतकऱ्यांची कर्जमाफी, २५ हजार महिलांची पोलीस भरती अशी १० मोठी आश्वासने दिली आहेत."२०१४ साली झालेल्या निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात याच ठिकाणावरून आम्ही केली होती. आता देखील या ठिकाणाहून प्रचाराची सुरुवात आम्ही करत आहोत.

### मुख्यमंत्र्यांचे 10 मोठे आश्वासनं

आता २३ तारखेला आम्ही विजयाचा गुलाल घेतल्यानंतर पुन्हा या ठिकाणी आल्याशिवाय राहणार नाहीत. आमच्या महायुतीचा जो जाहीरनामा आहे, त्या जाहीरनाम्यातील १० प्रमुख आश्वासने आज या ठिकाणी मी तुमच्यासमोर सांगत आहे. आम्ही जे बोलतो ते करतो. त्यामुळे आता आम्ही लाडक्या बहिणींना १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये करणार असल्याचं आश्वासन आम्ही देत आहोत", असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.लाडक्या बहिणींना १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये देण्याचं आश्वासन.२५ हजार महिलांची पोलीस दलात भरती करण्याचं आश्वासन.

---

# सरकार आल्यानंतर फुकट गोष्टी मिळणार नाहीत

## लाडकी बहीण योजनेवरून राज ठाकरेंचा हल्लाबोल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राज्यात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सध्या सर्वच नेत्यांच्या प्रचाराच्या सभांचा धडाका सुरु आहे. या सभांच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत.**



यातच आज मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची यवतमाळमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना राज ठाकरे यांनी महायुती सरकारने सुरु केलेल्या लाडकी बहीण योजनेवर टीका केली आहे. तसेच ‘उद्या माझं सरकार आल्यानंतर असल्या कोणत्याही फुकट गोष्टी मिळणार नाहीत’, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

माझ्या राजकारणाला १९८९ साली सुरुवात झाली. १९९२ साली मी नागपूरमध्ये एक मोठा मोर्चा काढला होता. १९९२ हा काळ सर्वांना खडबडून जागा करणारा होता. त्या काळात अनेक घडामोडी घडल्या होत्या. तेव्हा मी विदर्भात खूप वेळ असायचो. अमरावती, यवतमाळ इकडे मी फिरत असायचो. अमरावती तर माझं घर झालं होतं. सांगण्याचा उद्देश हाच आहे की मी इकडे नवीन नाही. या ठिकाणचे सर्व विषय मला माहिती आहे. प्रश्न देखील माहिती आहेत. मात्र, मला वाईट हे वाटतं की अजूनही तेच प्रश्न आहेत. प्रश्न बदलले नाहीत", असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

### राज ठाकरे काय म्हणाले?


"यवतमाळ जिल्ह्याला कापसाचा जिल्हा म्हटलं जातं. कापसावरून हा जिल्हा श्रीमंत असायला पाहिजे होता. पण हा यवतमाळ जिल्हा आत्महत्याग्रस्त म्हणून ओळखला जातो. आतापर्यंत एवढे सरकार आले आणि गेले. मग एवढे सरकार येऊन गेले आणि आपण त्यांना कधीही विचारात नाहीत. मी तुम्हाला एवढं विचारायला आलो आहे की, गेल्या पाच वर्षात काय-काय राजकारण झालं? मग तुम्ही मतदार म्हणून कधी विचार करता की नाही? मग त्याच त्याच माणसांसाठी तुम्ही मतदान करणार असाल तर तुमचं तुम्हाला लखलाभ", असंही राज ठाकरे म्हणाले.

# ‘व्हाइट हाऊस’साठी अटीतटीची लढाई!

## अमेरिकेत मतदान सुरु; ट्रम्प-हॅरीस यांच्यात चुरस

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेत अध्यक्षपदाच्या निवडीसाठी मतदान पार पडत आहे. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार व अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार व विद्यमान उपाध्यक्षा कमला हॅरिस यांच्यात राष्ट्राध्यक्षपदासाठी थेट लढत पहायला मिळत आहे. आधी जो बायडेन यांच्याशी ट्रम्प यांचा थेट सामना होणार होता. पण ऐनवेळी बायडेन यांच्या माघारीमुळे कमला हॅरिस यांना उमेदवारी देण्यात आली.**





भारतीय वंशाच्या कमला हॅरीस व डोनाल्ड ट्रम्प या दोघांनाही अध्यक्षीय निवडणुकीसाठीच्या जनमत चाचणीमध्ये जवळपास समसमान विजयाची संधी असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. त्यामुळे आजचं मतदान व त्यानंतरचे निकाल याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. कमला हॅरिस या आफ्रिकन-अमेरिकन म्हणून स्वतःची ओळख सांगत असल्या तरीही त्यांच्यावर भारतीय संस्कारही झाले आहेत. त्यांच्या आई भारतीय असल्याने भारतीय माध्यमांत भारतीय वंशांच्या कमला हॅरिस असं संबोधलं जातं. अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी कोणत्याही उमेदवाराला २७० मतांची आवश्यकता आहे. यासाठी प्रामुख्याने ॲरिझोना, जॉर्जिया, मिशिगन, नवाडा, नॉर्थ कॅरोलिना, पेनसिल्वानिया आणि विस्कॉन्सिन या राज्यांमधील मतं महत्त्वाची भूमिका बजावतील. न्यू हॅम्पशायरमध्ये स्थानिक वेळेनुसार सकाळपासूनच मतदानासाठी अमेरिकन नागरिकांनी रांगा लावायला सुरुवात केली. फ्लोरिडा, जॉर्डजिया, इलिनॉईज, लुसियाना, मेरिलँड, मॅसेच्युसेट्स, मिशिगन, मिसुरी, पेनसिल्वानिया, ऱ्होड आयलँड, साऊथ कॅरोलिना, वॉशिंग्टन डीसी या राज्यांत मतदान सुरू झाले आहे. अधिक राज्यांमध्ये मतदान केंद्रे उघडली आहेत, ज्यात न्यूयॉर्क आणि इंडियानाचा समावेश आहे.

कनेक्टिकट, इंडियाना, केंटकी, मेन, न्यू जर्सी, न्यूयॉर्क आणि व्हर्जिनिया येथील मतदार आता मतदान करत आहेत. इंडियाना आणि केंटकीमध्ये मतदान केंद्रे सकाळी ६ वाजता (स्थानिक वेळेनुसार) उघडली गेली, परंतु काही सेंट्रल टाइम झोनमध्ये सकाळी ७ वाजता (स्थानिक वेळेनुसार) उघडली गेली. न्यू हॅम्पशायरमधील छोट्या डिक्सविल नॉच टाउनशिपमध्ये मध्यरात्री मतदान झाले, अनेक दशकांपासून चालत आलेल्या परंपरेनुसार; उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस आणि माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना प्रत्येकी तीन मते मिळाली. अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदासाठी मतदानाला सुरुवात झाली असून कमला हॅरिस आणि डोनाल्ड ट्रम्प याच्यात कडवी लढत सुरू आहे. डेमोक्रॅटीक आणि रिपब्लिक पक्षांच्या उमदेवारांनी मतदारांना मतदान केंद्रावर आणण्यासाठी संपूर्ण ताकद लावली आहे. दरम्यान काही राज्यांमध्ये मध्यरात्रीपासून मतदानाला सुरुवात झाली होती. त्यानंतर मतमोजनी सुरू झाली असून हॅरिस आणि ट्रम्प यांना प्रत्येकी ३ मतं मिळाली आहेत. कॅनडाच्या सीमेला लागून असलेल्या न्यू हॅम्पशायरमध्ये सोमवारी मध्यरात्री मतदानाला सुरुवात झालं होतं. यानंतर न्यू हॅम्पशायरच्या डिक्सविले नॉचमध्ये मतमोजणी सुरू झाली असून आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार कमला हॅरिस आणि डोनाल्ड ट्रम्प यांना प्रत्येकी तीन मते मिळाली आहेत. वास्तविक, निवडणूक नियमांनुसार, 100 पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या भागात मध्यरात्री मतदान सुरू होतं.

### पहिलं मत हॅम्पशायरमध्ये

डिक्सव्हिल नॉचच्या स्थानिक लोकांनी 2020 मध्ये जो बिडेन यांना मतं दिली होती. दरम्यान अध्यपदाच्या या निवडणुकांचे निकाल जाहीर होण्यास काही दिवस लागू शकतात. नवीन राष्ट्राध्यक्ष जानेवारी 2025 मध्ये पदाची शपथ घेतील. दोन्ही उमेदवारांनी स्विंग राज्यांवर लक्ष केंद्रित केलं आहे. पॉप स्टार्सपासून ते अनेक हाय प्रोफाईल नेत्यांपर्यंत अनेकजण कमला हॅरिसच्या समर्थनार्थ उभे आहेत, तर इलॉन मस्क आणि मेल गिब्सनसारख्या प्रसिद्ध व्यक्तींनी ट्रम्प यांना पाठिंबा दिला आहे. दरम्यान स्थानिक मीडिया हाऊस न्यूयॉर्क टाइम्सच्या सर्वेक्षणानुसार, मतदानाच्या दिवशीच्या सर्वेक्षणावर विश्वास ठेवला तर कमला हॅरिस यांना 1 टक्के जास्त मते मिळताना दिसत आहेत. सर्वेक्षणानुसार अमेरिकेच्या निवडणुकीत त्यांना 49 टक्के मते मिळत असल्याचे दिसत आहे. तर डोनाल्ड ट्रम्प यांना ४८ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील मिशिगनमध्ये शेवटची निवडणूक रॅली केली.

# वैयक्तिक मालमत्ता समाजासाठी संपत्ती असू शकत नाही

## काही खासगी मालमत्ता समाजासाठी उपयुक्त संपत्ती असू शकते

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाने आज वैयक्तिक मालमत्तेबाबत महत्वाचा निर्णय सुनावला आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना म्हटलंय की प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक संपत्ती समाजासाठी उपयुक्त मालमत्तेचे संसाधन असेलच असं नाही. म्हणजे, प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक मालमत्ता समाजासाठी वापरता येईलच असं नाही.**



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली नऊ न्यायाधीशांनी मंगळवारी (५ नोव्हेंबर) हा निर्णय सुनावला. स्वतःच्या कमाईची खासगी मालमत्ता संविधानाच्या अनुच्छेद ३९ (बी) अंतर्गत समाजासाठी उपयुक्त मालमत्ता मानली जाऊ शकत नाही, असं या घटनापीठाने आज निर्णय दिला. घटनापीठाने तीन भागातील हा निर्णय सुनावताना म्हटलंय की, काही खासगी मालमत्ता समाजासाठी उपयुक्त संपत्ती असू शकते, पण प्रत्येक खासगी मालमत्ता समाजासाठी उपयुक्त संसाधन असू शकत नाही. न्यायाधीश हृषिकेश रॉय, बीवी नागारत्ना, जेबी पारडीवाला, सुधांशू धूलिया, मनोज मिश्रा, राजेश बिंदल, सतीश चंद्र शर्मा आणि ऑगस्टिन जॉर्ज मसीह या घटनापीठात समाविष्ट होते. कलम ३९ (बी) अंतर्गत सार्वजनिक आणि खासगी मालमत्ता समाजाच्या उपयुक्त संपत्तीच्या कक्षेत येतात असा निर्णय कर्नाटक कोर्टाने १९७७ साली दिला होता. तर, संजीवव कोक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी विरुद्ध भारत कुकिंग कोल लिमिडेट प्रकरणातही १९८२ साली घटनापीठने न्यायमूर्ती अय्यर यांच्या माताचं समर्थन करण्यात आलं होतं.

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय!

या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना म्हटलंय की प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक संपत्ती समाजासाठी उपयुक्त मालमत्तेचे संसाधन असेलच असं नाही. समाजासाठी वापरता येईलच असं नाही. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली नऊ न्यायाधीशांनी मंगळवारी (५ नोव्हेंबर) हा निर्णय सुनावला. स्वतःच्या कमाईची खासगी मालमत्ता संविधानाच्या अनुच्छेद ३९ (बी) अंतर्गत समाजासाठी उपयुक्त मालमत्ता मानली जाऊ शकत नाही, असं या घटनापीठाने आज निर्णय दिला.

# कंगणाच्या बिल्किस बानोवरील चित्रपटाला जिओने नाकारली परवानगी!

सध्या जगभरात बिल्कीस बानो प्रकरण चर्चेत आहे. बिल्कीस बानो प्रकरणातील दोषीची शिक्षा गुजरात सरकारने रद्द केली, त्यासंदर्भात काल सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत गुजरात सरकारचा निर्णय रद्द केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी मोठा निकाल देत ११ दोषींची सुटका नाकारली आहे. आता एकीकडे या प्रकरणाची चर्चा असताना आता बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौतने बिल्किस बानो प्रकरणावर चित्रपट तयार करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. बिल्किस बानो प्रकरणात सोमवारी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर बिल्किस बानो प्रकरणाला वेगळे वळण मिळाले तर त्यानंतर कंगना रणौतने तिच्या अधिकृत X



अकाऊंटवर या प्रकरणाबाबत ट्विट केले आहे. कंगनाच्या एका चाहत्यानं तिला विचारले की, 'कंगना, तू नेहमी महिलांच्या हक्कांबद्दल बोलतेस. महिलांना त्यांचे हक्क मिळावेत यासाठी काम करते. मला तुला हे विचारायचे आहे की, तुला 'बिल्किस बानो'वर चित्रपट बनवायचा आहे का? स्त्रीवादासाठी नाही, एक स्त्री म्हणून तुला तिची कथा जगासमोर आणायला आवडेल का?' कंगना राणौतने देखील या चाहत्यांच्या ट्विटर उत्तर देताना लिहिले की, 'मला 'बिल्कीस बानो'वर चित्रपट बनवायचा आहे आणि गेल्या तीन वर्षांपासून या चित्रपटाच्या स्क्रिप्टवर काम करत आहे. त्याबाबत मी संशोधन करत आहे. यासाठी मी सर्व ओटीटी प्लॅटफॉर्मशी संपर्क साधला, मात्र प्रत्येकाने कोणत्या ना कोणत्या कारणाने चित्रपटाला नकार दिला.'

## श्रेया कुळकर्णीचा 'डिलिव्हरी बॉय

जळगावच्या अभिनेत्री श्रेया कुळकर्णीने हिंदी व मराठी मालिकांसह मराठी चित्रपटांमध्येही काम केले आहे. ती एक मॉडेल सुद्धा आहे. गेले अनेक दिवस तिच्या नव्या चित्रपटाची अर्थात 'डिलिव्हरी बॉय'ची चर्चा सगळीकडे रंगलेली होती. आता हा चित्रपट पुढील महिन्याच्या ९ तारखेला प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात ती एक आगळीवेगळी भूमिका साकारताना दिसणार आहे. श्रेया कुळकर्णीचा प्रदर्शित होणाऱ्या डिलिव्हरी बॉय या चित्रपटात ती एका आव्हानात्मक महिलेच्या भूमिकेत दिसणार आहे. श्रेयाने ही भूमिका साकारण्यासाठी अथक मेहनत घेतली आहे. शालन असे तिच्या व्यक्तिरेखेचे नाव आहे. ही एका गर्भवती महिलेची भूमिका आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना एका नवीन वैज्ञानिक शस्त्रक्रियेबाबत माहिती देणारा आहे. श्रेयाच्या अभिनयाचा हा एक मोठा टप्पा असून अभिनयाची आवड जोपासायला तिला ती कुटुंबीयांकडून नेहमीच सहकार्य मिळते. आई-वडिलांबरोबरच सासरच्या मंडळींनीही नेहमीच अभिनयासाठी प्रोत्साहन दिले आहे, असे श्रेया सांगते. आई आरती कुलकर्णी आणि वडील राजेंद्र कुलकर्णी यांनी लहानपणापासून तिची ही आवड जोपासली. श्रेया अभिनेत्री असून एक सॉफ्टवेअर इंजिनिअरदेखील आहे. ळगावसारख्या छोट्याशा शहरातून येऊन मुंबईच्या मायानगरीत आपले स्थान बनवायला तिला खूप संघर्ष करावा लागला. “डिलिव्हरी बॉय ” हा चित्रपट एका संवेदनशील विषयावर भाष्य करणारा आहे. या चित्रपटात श्रेयाबरोबरच प्रथमेश परब, पृथ्वीक प्रताप आदी कलाकारही काम करीत आहेत. मोहसीन खान या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत.



## सुष्मिताच्या 'आर्या 3 'चा दमदार टीझर आऊट

बॉलिवूड अभिनेत्री सुष्मिता सेन (SUSHMITA SEN) पुन्हा एकदा ओटीटी (OTT) विश्व गाजवण्यासाठी सज्ज आहे. सुष्मिताची 'आर्या 3' (AARYA 3) ही बहुप्रतीक्षित सीरिज लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या सीरिजचा दमदार टीझर समोर आला आहे. आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर सुष्मिता प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. शेरनी येण्याची वेळ आता आली आहे. सुष्मिताच्या 'आर्या' आणि 'आर्या 2' या वेबसीरिजने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता 'आर्या 3'च्या माध्यमातून धमाका करण्यासाठी सुष्मिता सज्ज आहे. 'आर्या 3' ही सीरिज 9 फेब्रुवारी 2024 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हॉटस्टारवर ही सीरिज प्रेक्षकांना पाहता येईल. 2020 मध्ये आलेल्या 'आर्या' या सिनेमाच्या माध्यमातून सुष्मिताने अभिनयक्षेत्रात कमबॅक केलं होतं. तर या सीरिजच्या माध्यमातून अभिनेत्रीने ओटीटी विश्वात पदार्पण केलं होतं. या सीरिजमधील सुष्मिताच्या भूमिकेचं खूप कौतुक झालं. आपल्या मुलांच्या संरक्षणासाठी जगासोबत भांडताना अभिनेत्री दिसून आली होती. 'आर्या 3'च्या टीझरमध्ये सुष्मिता सेन म्हणत आहे,"आखिरी सांस लेनेसे पहले वह आखिरी झटका जरूर मारेगी". या सीरिजबद्दल बोलताना सुष्मिता म्हणाली,"आर्याचं माझ्या हृदयात एक वेगळं स्थान आहे. या सीरिजचा प्रत्येक भाग हा कमाल आहे. आता या सीरिजमध्ये एक वेगळी आर्या तुम्हाला पाहायला मिळणार आहे. या भूमिकेने मला खूप काही दिलं आहे.



## पापाराझीवर भडकला सैफ अली खान

प्रसिद्ध अभिनेता सैफ अली खान (SAIF ALI KHAN) आणि अभिनेत्री करीना कपूर खान (KAREENA KAPOOR KHAN) हे बॉलिवूडमधील प्रसिद्ध जोडप्यांपैकी एक आहे. दोघेही अनेकदा त्यांच्या मुलांसोबत स्पॉट होतात. पापाराझी अनेकवेळा सैफ आणि करिनाचे फोटो क्लिक करतात. नुकताच सैफ हा करीना आणि त्याचा मुलगा जेह यांच्यासोबत स्पॉट झाला. यावेळी काही पापाराझींनी जेह आणि सैफचे फोटो क्लिक केले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये सैफ हा पापाराझीवर भडकलेला दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये सैफ पापाराझींना फटकारताना दिसत आहे. व्हिडीओमध्ये दिसते की, सैफ हा त्याचा धाकटा मुलगा जेह याचा हात धरून स्टेडियममधून बाहेर येतो. यादरम्यान पापाराझी त्यांचे फोटो काढतात. पण सैफला ही गोष्ट अजिबात आवडत नाही आणि मग तो पापाराझींवर चिडतो. तो म्हणतो, "एक सेकंद भाईसाहेब, आधी लाइट्स बंद करा... इथे मुलं फुटबॉल खेळत आहेत आणि तुम्ही लोक याला फिल्मी इव्हेंट बनवत आहात." सैफ अली खान आणि करीना कपूर हे स्टेडियममध्ये पोहोचले होते जिथे त्यांची दोन मुले तैमूर आणि जेह हे फुटबॉल खेळत होते. काही दिवसांपूर्वी सैफ, करीना, तैमूर आणि जेह हे हॉलिडेला गेले होते.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध जिंकूच शकत नाही!

## सुनील गावस्करांनी टीम इंडियाबद्दल मोठं वक्तव्य केलं

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पाच कसोटी सामन्यांची बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी खेळली जाणार आहे. या मालिकेकसाठी भारतीय संघ काही दिवसांत ऑस्ट्रेलियाला रवाना होणार आहे. २२ नोव्हेंबरपासून या मालिकेला पर्थमध्ये सुरुवात होईल. यानंतर इतर सामने ॲडलेड, ब्रिस्बेन, मेलबर्न आणि सिडनी येथे खेळले जाणार आहेत. या मालिकेला सुरुवात होण्यापूर्वी भारताचे दिग्गज क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी भारतीय संघाबद्दल मोठे विधान केले आहे.**




ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताच्या विजयाच्या शक्यतांवर सुनील गावस्करांनी मोठे विधान केले आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) २०२३-२५ च्या अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी भारताला पाचपैकी किमान चार कसोटी सामने जिंकावे लागणार आहेत. परंतु सुनील गावस्करांना वाटते भारतीय संघ चार सामन्या जिंकू शकणार नाही. त्यांनी असे भाकीत केले आहे. भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या चार कसोटी मालिका जिंकल्या आहेत. विशेष म्हणजे त्यापैकी दोन ऑस्ट्रेलियात झाल्या आहेत. २०१४/१५ च्या हंगामात ऑस्ट्रेलियाने भारताला कसोटी मालिकेत पराभूत केले होते. म्हणजे या गोष्टीला जवळपास १० वर्षे उलटून गेली आहेत, तरी कांगारु संघाला भारताविरुद्ध जिंकता आलेली नाही.यंदा टीम इंडिया ऑस्ट्रेलियाला ४-० ने पराभूत करू शकणार नाही, असा विश्वास सुनील गावस्कर यांनी व्यक्त केला आहे. तथापि, गावस्कर यांनी असेही सांगितले की भारताचे लक्ष केवळ बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीवर असले पाहिजे आणि डब्ल्यूटीसी अंतिम फेरीत पोहोचण्याच्या शक्यतेवर नसावे. इंडिया टुडेशी बोलताना सुनील गावस्कर म्हणाले, “नाही, मला वाटत नाही. मला खरोखर वाटते की भारत कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलियाला ४-० ने पराभूत करू शकत नाही. त्यांनी तसे केल्यास मला खूप आनंद होईल. भारत ३-१ च्या फरकाने जिंकू शकतो. पण ४-० ने नाही. मला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलबद्दल बोलायचे नाही.”सुनील गावस्कर पुढे म्हणाले, “मला वाटते वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलवर लक्ष न देता, भारतीय संघाने आता फक्त ऑस्ट्रेलियात मालिका जिंकण्यावर लक्ष केंद्रित करावे. मग तुम्ही ही मालिका १-०, २-०, ३-०, ३-१ किंवा, २-१ च्या फरकाने जिंकलात तरी काही फरक पडत नाही. मात्र, पुढे जा आणि जिंका. कारण त्यामुळेच आपल्या सर्व भारतीय क्रिकेट चाहत्यांना पुन्हा बरे वाटेल.”ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताच्या विजयाच्या शक्यतांवर सुनील गावस्करांनी मोठे विधान केले आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) २०२३-२५ च्या अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी भारताला पाचपैकी किमान चार कसोटी सामने जिंकावे लागणार आहेत. परंतु सुनील गावस्करांना वाटते भारतीय संघ चार सामन्या जिंकू शकणार नाही. त्यांनी असे भाकीत केले आहे. भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या चार कसोटी मालिका जिंकल्या आहेत. विशेष म्हणजे त्यापैकी दोन ऑस्ट्रेलियात झाल्या आहेत. २०१४/१५ च्या हंगामात ऑस्ट्रेलियाने भारताला कसोटी मालिकेत पराभूत केले होते. म्हणजे या गोष्टीला जवळपास १० वर्षे उलटून गेली आहेत, तरी कांगारु संघाला भारताविरुद्ध जिंकता आलेली नाही.यंदा टीम इंडिया ऑस्ट्रेलियाला ४-० ने पराभूत करू शकणार नाही, असा विश्वास सुनील गावस्कर यांनी व्यक्त केला आहे. तथापि, गावस्कर यांनी असेही सांगितले की भारताचे लक्ष केवळ बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीवर असले पाहिजे आणि डब्ल्यूटीसी अंतिम फेरीत पोहोचण्याच्या शक्यतेवर नसावे. इंडिया टुडेशी बोलताना सुनील गावस्कर म्हणाले, “नाही, मला वाटत नाही. मला खरोखर वाटते की भारत कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलियाला ४-० ने पराभूत करू शकत नाही. त्यांनी तसे केल्यास मला खूप आनंद होईल. भारत ३-१ च्या फरकाने जिंकू शकतो. पण ४-० ने नाही. मला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलबद्दल बोलायचे नाही.”सुनील गावस्कर पुढे म्हणाले.

### किमान चार सामने जिंकावे लागणार

मला वाटते वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलवर लक्ष न देता, भारतीय संघाने आता फक्त ऑस्ट्रेलियात मालिका जिंकण्यावर लक्ष केंद्रित करावे. मग तुम्ही ही मालिका १-०, २-०, ३-०, ३-१ किंवा, २-१ च्या फरकाने जिंकलात तरी काही फरक पडत नाही. मात्र, पुढे जा आणि जिंका. ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताच्या विजयाच्या शक्यतांवर सुनील गावस्करांनी मोठे विधान केले आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) २०२३-२५ च्या अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी भारताला पाचपैकी किमान चार कसोटी सामने जिंकावे लागणार आहेत.

# एजाजसारखे गोलंदाज प्रत्येक क्लबमध्ये

## मुंबईतील पराभवानंतर कैफ टीम इंडियावर संतापला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यूझीलंडने फिरकी गोलंदाजांच्या जोरावर भारताविरुद्धचा मुंबईतील तिसरा कसोटी सामना जिंकला. मुंबईत झालेल्या या सामन्यात भारताला शेवटच्या डावात विजयासाठी १४७ धावांचे लक्ष्य होते. एजाज पटेल आणि ग्लेन फिलिप्ससमोर टीम इंडियाची दुसरा १२१ धावांवरच गारद झाला. एजाज इजाजने या सामन्यात एकूण ११ विकेट घेतल्या.**




त्याचवेळी पार्ट टाईम फिरकी गोलंदाज ग्लेन फिलिप्सनेही भारतीय फलंदाजांना खूप त्रास दिला. आता भारताचा माजी खेळाडू मोहम्मद कैफने एजाच पटेलबद्दल मोठं वक्तव्य केलं आहे.मुंबई कसोटी न्यूझीलंडच्या विजयात एजाज पटेलने महत्त्वाची भूमिका बजावली. या कामगिरीनंतरही भारताचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफने एजाज पटेलच्या योगदानाने प्रभावित झालेला नाही. सोशल मीडियावरील एका व्हिडिओमध्ये कैफने सांगितले की, भारतातील प्रत्येक क्लबमध्ये या दर्जाचे गोलंदाज आहेत. कैफ म्हणाला, ‘एजाज पटेलने प्रभावित करणारी गोलंदाजी केली नाही. जर तुम्ही त्याचा पिच मॅप पाहिला तर त्याने दोन फुलटॉस, दोन शॉर्ट आणि दोन लेंथ बॉल टाकले, परंतु तरीही तो विकेट घेण्यात यशस्वी झाला.”न्यूझीलंडचा अर्धवेळ (पार्ट-टाइम) फिरकीपटू ग्लेन फिलिप्सबद्दलही या माजी भारतीय फलंदाजाने असेच काहीसे सांगितले. मोहम्मद कैफ पुढे म्हणाला, “ग्लेन फिलिप्स हा अर्धवेळ गोलंदाज आहे आणि त्याला चांगली गोलंदाजी कशी करावी हे माहित नाही. आपण चांगल्या फिरकीपटूंकडून नाही तर अर्धवेळ गोलंदाजांकडून हरलो आहोत.

### मिचेल सँटनरचे कौतुक केले

एजाज पटेलने वानखेडे स्टेडियमवर २२ विकेट्स घेतल्याचे लोक म्हणतील. त्याला चेंडू नीट कसा टाकायचा हेही कळत नाही. एजाज पटेलने एका षटकात केवळ दोन चांगले चेंडू टाकले आणि विकेट्स घेतल्या. त्यामुळे शेवटच्या कसोटीतील पराभव लाजिरवाणा आहे. मोहम्मद कैफने पुणे कसोटीत ११ विकेट्स घेणारा न्यूझीलंडचा एकमेव फिरकी गोलंदाज मिचेल सँटनरचे कौतुक केले.